# उमवि/2/निवडणूक/242/2018 दि.7/5/2018 रोजी दिलेले आदेशा विरुध्द कुलगुरु उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांचेकडे दाखल केलेले अपीलावर निर्णय

डॉ.देवेंद्र सोना चौधरी ......अपिलकर्ता
प्राध्यापक, इलेक्ट्रानिक
शासकीय अभियंत्रिकी महाविद्यालय जळगाव

विरुध्द

निवडणूक अधिकारी, .......रिस्पोंडट
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव.

1) अपलीकर्ता यांनी सदरचे अपील निवडणूक अधिकारी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांनी त्यांचे उमवि/2/निवडणूक/242/2018 दि.7/5/2018 रोजी दिलेले आदेशा विरुध्द दि.8/5/2018 रोजी दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलान्वये, अपीलकर्त्याने त्यास महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठे अधिनीयम 2016 चे कलम 40 (2) (d) (i) मधील तरतुदीनुसार, विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेतंर्गत "Electronic and Tele communication and Industrial Electronic Engineering" या विद्याशाखे मध्ये भरलेला नामनिर्देशन अर्ज छाननीअंती अवैध ठरविलेला असुन त्या विरुध्द सदरचे अपील दाखल केलेले आहे.

सदरच्या अपीलात अपीलकर्त्याने नमूद केलेले आहे की अपीलकर्ता हा मान्यता प्राप्त संशोधक मार्गदर्शक असुन दि.7/5/2018 रोजी त्याच्या विद्यार्थ्याचे पीएच.डी. पदवीचे नोटीफिकेशन प्रसिध्द झालेले आहे. यासह अन्य मुद्दे विवादीत केलेले आहेत.

2) प्राप्त झालेल्या अपीलाच्या अनुषंगाने उभय त्यांचे म्हणणे ऐकुन घेण्यासाठी दि.9/5/2018 रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली परंतु अपीलकर्त्याचे विनंतीवरुन सदरहु अपीलाची सुनावणी दि.10/5/2018 रोजी सकाळी 11:00 वाजता कुलगुरु कार्यालयात ठेवण्यात आली. सदरहु सुनावणीवेळी अपीलकर्ता व रिस्पोंडट स्वत: उपस्थित होते.

3) सदरचे सुनावणीवेळी अपीलकर्त्याने निर्दशनास आणुन दिले की, श्री.खडके राजेंद्रकुमार हरीभाऊ या विद्यार्थ्यास दि.7/5/2018 रोजी पीएच.डी. नोटीफिकेशन विद्यापीठाने प्रसिध्द केले असुन सदरहु विद्यार्थ्याचा तो संशोधक मार्गदर्शक आहे. सदरच्या पीएच.डी. नोटीफिकेशन विद्यापीठाने प्रसिध्द केलेली प्रत अपीलासोबत जोडलेली आहे. त्याची प्रत निवडणुक अधिकाऱ्याकडे सादर केलेली आहे. सबब अपीलकर्त्याचा वर उल्लेखीत नामनिर्देशन अर्ज वैध ठरविण्याबाबत विनंती केली. या मागणीशिवाय अपीलकर्त्याची अन्य मागणी नाही असा युक्तीवाद सादर केला.



RMali
15/5/18

सदरहू सुनावणीवेळी रिस्पोंडट यांनी नमूद केले की नामनिर्देशन अर्जाची छानननी वेळी अपलीकर्ता हा महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठे अधिनीयम 2016 चे कलम 40 (2) (d) (i) मधील नमुद केल्याप्रमाणेची पात्रता करीत नसल्यामुळे अपीलकर्त्यांनी सादर केलेला अर्ज अवैध ठरविण्यात आलेला आहे व तसा आदेश निर्गमीत करण्यात आला आहे.

3) उभय पक्षानी सादर केलेला युक्तीवाद, अपीलाकामी दाखल असलेले रेकॉर्डचे अवलोकन निदर्शनासाठी अपीलकर्ता याचे वर उल्लेखीत नामनिर्देशन अर्जाची छानननी वेळी वर कलमाची तरतुदीतंर्गत अपीलकर्त्याचे मार्गदर्शनाखाली कमीत कमी दोन विद्यार्थ्यांना पीएच.डी. पदवी प्राप्त केल्याचे कागदपत्र रेकॉर्डवर असणे आवश्यक असते. अपीलकर्त्याने नामनिर्देशन अर्ज भरतेवेळी एकाच विद्यार्थ्याचे रेकॉर्ड सादर केले आहे व त्याचे दुसऱ्या विद्यार्थ्याचे त्यासंदर्भातील रेकॉर्ड हे दि.7/5/2018 रोजीच रिस्पोंडटकडे छानननी नंतर सादर केलेले आहे.

वरील तांत्रीक स्वरुपाचे वस्तुस्थिती विचारात घेता, आज रोजी अपीलकर्ता यांच्या मार्गदर्शनाखाली दोन विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी संपादीत केलेली आहे. सबब त्यानी सादर केलेला अर्ज हा वरील कलमातंर्गत अवैध ठरवणे नैसर्गिक न्याय तत्वला तसेच पारदर्शक निवडणूक प्रक्रियेला धरुन ठरणार नाही.

वरील संपूर्ण वस्तुस्थिती, दस्तऐवज विचारात घेता मी खालील प्रमाणेचा आदेश निर्गमित करीत आहे.

## आदेश

जा.क्र.NMU/02/Election/List of Invalid nominations for BOS Chairperson_Sci.& Tech./240/2018 दि.7/5/2018 रोजी निर्गमित केलेला आदेश रद्दबातल ठरविण्यात येत असून अपीलकर्त्याने सादर केलेला अर्ज वैध ठरविण्यात येत आहे.

10/5/18

प्रा.प्र.प्र.पाटील
कुलगुरु
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव

जळगाव
दि.10/5/2018